# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.10.2024** **वार:शनिवार**

---

1. भारत आणि जर्मनीदरम्यान विविध सामंजस्य करार
2. युक्रेन आणि पश्चिम आशियामधील युध्दपरिस्थितीबद्दल भारत आणि जर्मनीनं व्यक्त केली चिंता
3. दिवाळी आणि छठ पूजेसह आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर, उत्तर रेल्वेच्या विशेष गाड्यांच्या 195 अतिरिक्त फेऱ्या
4. इस्त्रायलचा इराणच्या सैन्यठिकाणांवर हवाई हल्ला आणि
5. भौतिक शास्त्रज्ञ प्राध्यापिका डॉक्टर रोहिणी गोडबोले यांचं निधन

**भारत-जर्मनी करार**

भारत आणि जर्मनी दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चांसलर ओलाफ स्कोल्झ यांच्या उपस्थितीत शिष्टमंडळ स्तरावरील चर्चेनंतर काल नवी दिल्लीत विविध सामंजस्य करार करण्यात आले. द्विपक्षीय संबंधांना चालना देण्यासाठी हरित हायड्रोजनपासून नवसंकल्पना आणि त्यासाठीचं तंत्रज्ञान यासंदर्भातील विविध सामंजस्य करारांवर काल स्वाक्षरी करण्यात आली. तसंच गुन्हेगारी प्रकरणांमध्ये परस्पर कायदेशीर सहाय्य, कौशल्य विकास, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण आदी अनेक क्षेत्रात सहकार्यासाठी सामंजस्य करार झाले. याशिवाय, दोन्ही बाजूंनी रोजगार आणि श्रम, नवीन तंत्रज्ञानातील संशोधन तसंच विकास आणि हरित नागरी सुविधांसंदर्भातील भागीदारी या क्षेत्रांतील देवाणघेवाण याबाबत चर्चा झाली. 2023 मध्ये द्विपक्षीय व्यापार 33 अब्ज डॉलर्स इतका होता आणि भारतातील एकत्रित जर्मन गुंतवणूक एकंदर 15 अब्ज डॉलर्स इतकी आहे. अशी माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्रि यांनी दिली.

युक्रेनमधील युध्दपरिस्थिती चिंताजनक असल्याचं भारत आणि जर्मनीनं काल नवी दिल्ली इथं जारी केलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. युध्दजन्य भागातील नागरिकांची परिस्थिती बिकट असल्याचं यामध्ये नमूद करण्यात आलं आहे. भारत-जर्मनी दरम्यानची 7 वी शिष्टमंडळ स्तरावरील बैठक काल पार पडली. त्यानंतर हे निवेदन जारी करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चांसलर ओलाफ स्कोल्झ यांनी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अनुषंगाने सर्वसमावेशक, न्याय्य आणि चिरस्थायी शांततेची गरज असल्याचा पुनरुच्चार यावेळी केला. कोणत्याही प्रकारचा दहशतवाद आणि हिंसा निषेधार्ह आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने नियुक्त केलेल्या सर्व दहशतवादी गटांविरुद्ध एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहनही दोन्ही नेत्यांनी केलं. याबरोबरच पश्चिम आशियातही शांतता आणि स्थैर्य नांदावं यासाठी प्रयत्न करण्याबाबत चर्चा झाली. भारत आणि जर्मनीनं समृद्धी आणि सुरक्षिततेसाठी तसेच जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी हिंद प्रशांत क्षेत्राचं किती महत्त्व आहे अशा मुद्यांवर भर दिला.

**राष्ट्रपती**

संपूर्ण जगासाठी कृत्रिम बुध्दीमत्ता हे भविष्यातील प्राथमिकता असलेलं क्षेत्र म्हणून पुढे येत आहे. हे नवं तंत्रज्ञान युवक आणि विविध क्षेत्रासाठी नव्या संधी खुल्या करणार असल्याचं राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी काल छत्तीसगडमध्ये

सांगितलं. रायपूर इथं राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या पदवीप्रदान समारंभात त्या बोलत होत्या. संगणकांना विविध प्रकारची काम करण्यासाठी आणखी सक्षम करणारं, कृत्रीम बुध्दीमत्ता हे तंत्र परिवर्तनकारी साधन असून तरुणांसाठी विविध क्षेत्रातील संधी उपलब्ध करुन देत आहे. असं त्या म्हणाल्या

**<u>भारत-इटली</u>**

भारत आणि इटलीदरम्यान सायबर संवादाचं उद्घाटन काल नवी दिल्ली झालं. सायबर क्षेत्रातील सुरक्षितता काळानुरुप बदलणारी असावी यासंदर्भात सहकार्य वाढविण्यावर दोनही देशांनी मान्यता देण्यात आली. सायबर धोक्यांची व्याप्ती आणि अशा धोक्यापासून सुरक्षा सुनिश्चित करण्याची रणनीती या विषयावर तज्ञांनी विचारांची देवाणघेवाण केली. दोन्ही बाजूंनी महत्त्वपूर्ण माहितीच्या पायाभूत सुविधांचं संरक्षण आणि क्षमता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम कसे राबवता येतील यावरही विचारविनिमय झाला. सायबर आव्हानांचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्राकडून विकसित करण्यात आलेल्या डोमेनबाबत यावेळी चर्चा झाली. परराष्ट्र मंत्रालयाचे सहसचिव अमित शुक्ला यांनी या द्विपक्षीय बैठकीचे सह-अध्यक्षपद भुषवलं. इटालियन शिष्टमंडळात राष्ट्रीय सायबर सुरक्षा संस्था, पोस्टल पोलीस आणि सायबर सिक्युरिटी सर्व्हिस तसंच नवी दिल्लीतील इटलीच्या दूतावासातील प्रतिनिधींचा समावेश आहे.

**<u>रेल्वे</u>**

दिवाळी आणि छठ पूजेसह आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर, उत्तर रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी आजपासून पुढील महिन्याच्या 7 तारखेपर्यंत विशेष गाड्यांच्या 195 अतिरिक्त फेऱ्या चालवणार आहे. या गाड्या प्रामुख्याने नवी दिल्ली आणि आनंद विहार रेल्वे स्थानकांवरून पूर्वेकडील प्रदेशांसाठी रवाना होतील. उत्तर रेल्वेचे महाव्यवस्थापक अशोक कुमार वर्मा यांनी आकाशवाणीशी बोलताना ही माहिती दिली. प्रवाशांना आरामदायी प्रवास करता यावा यासाठी या वर्षी एक लाख सत्तर हजारांहून अधिक अतिरिक्त जागा उपलब्ध होणार आहेत. या विशेष गाड्यांमध्ये अनारक्षित श्रेणीतील प्रवाशांसाठी सुमारे 54 हजार अतिरिक्त जागा उपलब्ध करुन दिल्या असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<u>इस्त्रायल</u>**

इस्त्रायलनं आज इराणला प्रत्युत्तर देत सैन्यठिकाणांवर हल्ला केला असल्याची प्राथमिक माहिती इस्त्रायच्या सैन्यदलाकडून देण्यात आली आहे. या हल्ल्यानंतर ईराकनं आपल्या क्षेत्रातील सर्व हवाईसेवा बंद केली आहे. करज शहर तसंच तेहरानमध्ये अनेक ठिकाणी स्फोटांचे मोठे आवाज झाल्याचं इराणी माध्यमांचं वृत्त आहे. दरम्यान, याहल्ल्याबाबतची कल्पना अमेरिकेला दिली असल्याचं इस्त्रायलच्या सुत्रांनी सांगितलं असलं तरी आपला ईराणवरील हल्ल्यामध्ये कोणताही सहभाग नसल्याचं अमेरिकेनं स्पष्ट केलं आहे. इराणनं 1 ऑक्टोबरला इस्त्रायलवर केलेल्या हल्याला हे प्रत्युत्तर असल्याचं इस्त्रायलनं म्हटलं आहे

**<u>भारत आणि चीन</u>**

भारत आणि चीनदरम्यान पूर्व लडाख सीमाभागातील डेप्सांग आणि डेमचोक या प्रत्यक्ष ताबारेषाक्षेत्रातील सैन्यमाघारीला सुरुवात झाली आहे. दोनही देशांदरम्यान नुकत्याच झालेल्या करारानुसार साडेचार वर्षांनंतर या भागातील लष्करी साहित्य अलिकडच्या तळावर नेण्यास सुरुवात झाली आहे. या महिन्याच्या अखेरीपर्यंत सैन्यमाघारीची ही प्रक्रिया पूर्ण होईल अशी माहिती लष्कराकडून देण्यात आली आहे. या करारामुळे एप्रिल 2020 मध्ये सुरू झालेला तणाव निवळू शकतो. अशी माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी नुकतीच दिली होती. दोनही देशांदरम्यान मुत्सद्देगिरी आणि लष्करी स्तरावरील चर्चेमुळे पूर्व लडाख भागातील ताबा रेषेलगतची परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी व्यापक सहमती निर्माण झाली आहे. समान आणि परस्पर सुरक्षेच्या तत्त्वांवर एकमत होणं, दोन्ही बाजूंना प्रमुख क्षेत्रांमध्ये पारंपारिक पध्दतीनं गस्त

घालणं आणि जनावरांना चराई करण्यास पोषक असल्याचं उत्तरी कमांडचे कमांडींग इन चीफ लेफ्टनंट जनरल एम.व्ही. सुचिंद्र कुमार यांनी म्हटलं आहे.

**उमेदवारी अर्ज**

विविध राज्यांतल्या 47 विधानसभा मतदारसंघ आणि केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया काल संपली. उत्तर प्रदेशात विधानसभेच्या नऊ, राजस्थानमध्ये सात, पश्चिम बंगालमध्ये सहा, आसाममध्ये पाच, बिहार आणि पंजाबमध्ये प्रत्येकी चार, तर कर्नाटकातील तीन, केरळ आणि मध्य प्रदेशातील प्रत्येकी दोन जागांसाठी आणि सिक्कीम मध्ये पोटनिवडणूक होणार आहे. याशिवाय छत्तीसगड, गुजरात आणि मेघालयमध्ये प्रत्येकी एका जागेसाठी विधानसभेची पोटनिवडणूक होणार आहे. या जागांसाठी तसंच वायनाड लोकसभा मतदारसंघाच्या  पोटनिवडणूकीसाठी 13 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तर महाराष्ट्रातील नांदेड लोकसभा आणि उत्तराखंडमधील केदारनाथ विधानसभा जागेसाठी 20 नोव्हेंबर रोजी पोटनिवडणूक होणार आहे. 23 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

**झारखंड विधानसभा**

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी एकंदर 1 हजार 609 उमेदवारी अर्ज प्राप्त झाले आहेत. पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया काल संध्याकाळी संपली. बरकट्ठा विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक 70 अर्ज दाखल झाले. या पहिल्या टप्प्यासाठी 13 नोव्हेंबरला 43 मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे. 28 ऑक्टोबरला उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून, 30 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेता येतील. झारखंडमध्ये विधानसभेची निवडणूक दोन टप्प्यात होत आहे. दुसऱ्या टप्प्यासाठी 20 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. दरम्यान, विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यापासून राज्याच्या विविध भागात केलेल्या शोधमोहिमेत आतापर्यंत 51 कोटी रुपयांचं अवैध साहित्य आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. तर आदर्श आचारसंहितेचं उल्लंघन केल्याप्रकरणी आत्तापर्यंत सोळा प्राथमिक माहिती अहवाल दाखल करण्यात आले आहेत.

**पंतप्रधान-शोक**

पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित प्रसिद्ध भौतिक शास्त्रज्ञ प्राध्यापिका डॉक्टर रोहिणी गोडबोले यांचं काल निधन झालं, त्या 72 वर्षांच्या होत्या. बंगळुरू इथल्या भारतीय विज्ञान संस्थेत संशोधन विभागात त्या कार्यरत होत्या. मुळच्या पुण्याच्या रहिवासी असलेल्या रोहिणी गोडबोले यांचं प्राथमिक शिक्षण हुजुरपागा शाळेत झालं  होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. विज्ञानजगतात महिलांचं स्थान सक्षम करण्यात त्यांनी मोलाचं योगदान दिलं, रोहिणी गोडबोले यांचं कार्य पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करत राहतील, असं  मोदी यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड संघांदरम्यान पुण्यात सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात काल दुसऱ्या दिवशी न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावात 5 गडी बाद 198 धावा झाल्या होत्या. त्यामुळे न्यूझीलंडला पहिल्या डावातल्या 103 धावांसह एकंदर 301 धावांची आघाडी मिळाली आहे. तत्पूर्वी भारताचा पहिला डाव 156 धावांमध्येच संपुष्टात आला. न्यूझीलंडच्या मिशेल सॅन्टनरनं 17 षटकं आणि 3 चेंडूत भारताचे सात गडी बाद केले.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार